मासेमार नौकांवर संदेशवहन,मासळीचा शोध घेणे
इ.अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी
अर्थसहाय्य देण्यासची योजना राबविण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१०९६/१४४३२/(४९१) पदुम १४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-१२ ऑक्टोबर,१९९९.**

**प्रस्तावनाः-**

संकटकाळात मच्छिमारांना एकमेकांशी संपर्क साधणे सोपे व्हावे, त्यांना समुद्रामध्ये मासळीच्या साठयाची योग्य माहिती मिळावी या करिता तसेच मच्दिमारांना विशिष्ट दिशेला कमीतकमी अंतराच्या मार्गाने पाहेचण्याच्या दृष्टीने कोकण विकासाच्या कालबध्द कार्यक्रमातंर्गत २५ टन किंवा त्यापेक्षा जास्त वजनाच्या यांत्रिक नौकांवर वॉकी टॉकी सेट, एको साऊंडर व जी.पी.एस नेव्हीगेटर या सारखी अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी मच्छिमारांना अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

कोकण विकासाच्या कालबध्द कार्यक्रमांतर्गत २५ टन किंवा त्यापेक्षा जास्त वजनाच्या यांत्रिक नौकांवर एको साऊंडर,जी.पी.एस नेव्हीगेटर व वॉकी टॉकी या सारखी यंत्रसामुग्री बसविण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राबवण्यिास शासन मान्यता देण्यात येत आहे. ज्या लाभार्थीनी यापुर्वी शासकीय योजनेतून यांत्रिक नाकांसाठी लाभ घेतला आहे त्यांनाही खालील यंत्रसामुग्रीच्या खरेदीवर अनुदान देय आहे. मात्र ज्यांना खालील यंत्रसामुग्रीसाठी यापुर्वी शासनाच्या इतर योजनांतून अर्थसहाय्य प्राप्त झाले असेल तर अश्या लाभार्थ्यांना या योजनंतर्गत पुन्हा अनुदान देण्यात येऊ नये.

२. या योजनेंतर्गत उपरोक्त यंत्रसामुग्रीवर खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील. उर्वरित रक्कम लाभार्थिने स्वतः अथवा बँक/वित्तिय संस्थांमार्फत कर्जरुपाने उभी करावी. योजनेंतर्गत लाभार्थी निवडीच्या अटी,शर्ती व कार्यपध्दती परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

| यंत्रसामुग्री | अर्थसहाय्याचे प्रमाण व अर्थसहाय्याची कमाल मर्यादा |
|---|---|
| एको साऊंडर | यंत्रसामुग्री किंमतीच्या २५ टक्के परंतु रु.१५,०००/- च्या मर्यादेत |
| जीपीएस नेव्हीगेटर | यंत्रसामुग्री किंमतीच्या २५ टक्के परंतु रु.७५,०००/- च्या मर्यादेत |
| वॉकी टॉकी | यंत्रसामुग्री किंमतीच्या २५ टक्के परंतु रु.१२,५,००/- च्या मर्यादेत |

३. या योजनेसाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.डी-७
२४०५-मत्स्यव्यवसाय
१०३ सागरी मत्स्यव्यवसाय
१०३ (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
१०३ (दोन) (चार) यांत्रिक नौकेवर अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविणे
(ए) राज्य योजना (२४०५ ११७ १)

४. या योजनेसाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना आहरण व संनियंत्रण अधिकारी घोषित करण्यात येत आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय विकास यांनी या योजनेचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपूर्वी शासनास पाठवावा.

५. हे आदेश नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र.१४/९९/व्यय-१,दिनांक २०/२/१९९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(निर्मलचंद्र पवार)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,मुंबई
लेखा अधिकारी,आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,मुंबई

सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक,मुंबई/ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (मालवण)
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा),मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड(अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
उपकोषागार अधिकारी,मालवण,जि.सिंधुदुर्ग व पालघर जि.ठाणे
नियोजन विभाग,
वित्त विभाग (व्यय-१)/(अर्थसंकल्प-१४)
कक्ष अधिकारी (पदुम-१२,१३ व १६)कृषि व पदुम विभाग
निवडनस्ती

# परिशिष्ट-१
# नियमावली व कार्यपध्दती

**१) अर्थसहाय्याची अनुज्ञेयताः-**

स्वखर्चाने अथवा राष्ट्रीयकृत बँका,व्यापारी बँका,सहकारी बँका,सहकारी संस्था किंवा शासन अधिकृत महामंडळे यांच्याकडून कर्ज घेवून समुद्रात मासेमारी करणाया मच्छिमारांना त्यांच्या बोटींवर संदेशवहन यंत्रणा, मासळीचा शोध घेणे इ.अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविण्यासाठी अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

**२) अर्जदाराची पात्रताः-**

१.अर्जदाराच्या मालकीची २५ टन किंवा त्यापेक्षा जास्त वजनाची यांत्रिक नौका असावी.

२.तो स्थानिक अगर त्या परिसरातील (पंचक्रोशीतील) मच्छिमार सहकारी संस्थेचा सभासद असावा व सदर संस्थेने तो क्रियाशील मच्छिमार असल्याचा व संस्थेचा सभासद असल्याचा दाखला दिलेला असावा.

३.अर्जदाराचे वय १८ वर्षाहून कमी असावे.

४.उपरोक्त यंत्रसामुग्रीसाठी त्याने यापूर्वी शासनाच्या इतर कोणत्याही योजनेतून अनुदान घेतलेले नसावे.

**३) अर्ज करण्याची पध्दतः-**

अर्जदाराचे त्याचा अर्ज व संबंधित कागदपत्रे दोन प्रतीत विहीत नमून्यात जिल्हा कार्यालयाकडे सादर करावीत. जो अर्जदार कर्ज घेणार असेल अशा अर्जदाराचे अर्थसहाय्य पुरवठा करणाया संस्थेकडून कर्ज मंजूर झाल्यानंतर कर्ज मंजूरीचे पत्र व अन्य संबंधित कागदपत्रे दोन प्रतीत विहित नमुन्यात जिल्हा कार्यालयाकडे सादर करावीत.

**४) अर्जाची छाननीः-**

जिल्हा कार्यालयाकडे आलेल्या अर्जाची नोंद प्राप्त झालेल्या दिनांकानुसार करण्यात येईल. अर्जाचा प्राथम्य सूचीतील क्रमांकानुसार अर्जदार,अर्थसहाय्य मंजूरीस पात्र असल्याची खात्री, करुन, अर्थसहाय्य मंजूरीसाठी अर्जदाराच्या अर्जाची शिफारस तरतूदीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा कार्यालयाकडून प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, यांच्या कार्यालयाकडे करण्यात येईल.त्यानंतर प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक त्यावरील पुढील आवश्यक कार्यवाही पूर्ण करुन आवश्यक प्रस्ताव आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडे सादर करतील व आयुक्त मत्स्यव्यवसाय/प्रादेशिक कार्यालयामार्फत अंतिम मंजूरीचे आदेश काढण्यात येतील.

**५) मंजूर अर्थसहाय्याचे वितरणः-**

१.मंजूर आदेशासोबत पुढील अनुक्रमांक ६ येथे नमूद केलेल्या अटी व शर्ती अर्जदाराला मान्य/बंधनकारक असल्याबाबतचे व स्वतःचे/बँकेमार्फत ७५ टक्के भांडवल गुंतविण्यास तयार असल्याबाबतचे लेखी संमतीपत्र रु.१०/- च्या स्टँम्प पेपरवर अर्जदाराने संबंधित जिल्हा कार्यालयास देणे आवश्यक आहे.

२.अर्जदाराकडून उपरोक्त संमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर तसेच नौका मालकाने बँकेकडून कर्ज घेतल्यास कर्ज मंजूर झाल्याचे आदेश निघाल्यानंतर किंवा नौका मालक स्वतःचे ७५ टक्के भांडवल गुंतविण्यास तयार असल्यास आवश्यक ती रक्कम यंत्रसामुग्री पुरवठा करणाया कंपनीकडे जमा केल्याची पावती सादर केल्यानंतर कर्जदाराला आयुक्त कार्यालयामार्फत/प्रादेशिक कार्यालयामार्फत अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल. सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांच्या मार्फत अर्जदारास अर्थसहाय्य वितरीत करण्यात येईल व सदर अर्थसहाय्याची पोचपावती घेण्यात येईल.

३.अर्जदाराने अर्जात उल्लेख केलेली यंत्रसामुग्री प्रत्यक्षात घेतलेली आहे किंवा नाही याची खात्री सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष पडताळणी करुन करण्यात यावी. मंजूरी आदेशानुसार रक्कम स्विकारण्यास अर्जदाराने नकार दिल्यास किंवा रक्कम कोषागारातून काढली गेली नसल्यास त्याबाबतची माहिती उचित कारणासह प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक यांना कळविण्यात यावी.

**६) अर्थसहाय्य मंजूरीच्या अटी व शर्तीः-**

१. अनुदान मंजूर करण्यात आलेली यंत्रसामुग्री अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यापासून पाच वर्षांपर्यंत मत्स्यव्यवसाय आयुक्ताच्या पूर्व परवानगीशिवाय विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

२. यंत्रसामुग्री बसविलेल्या बोटींद्वारे पकडलेल्या मासळीसंबंधीची माहिती मत्स्यव्यवसाय विभागाने मागतल्यास ती लाभार्थ्यांस द्यावी लागेल.

३. अर्थसहाय्याचा लाभ घेणाया लाभार्थ्यांकडून उपरोक्त कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्याला देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम कर्ज समजून ती अर्थसहाय्य दिलेल्या दिनांकापासून त्यावर त्यावेळी प्रचलित असलेल्या व्याजाच्या दराने वसूल करण्यात येईल. या वसूलीकरीता प्रचलित कायद्यानुसार जमीन महसूलाची थकबाकी वसूलीसाठी जी पध्दत व नियम असतील ते लागू राहतील.

४. उपरोक्त अटी अर्थसहाय्य मिळाल्यापासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी लाभधारकावर बंधनकारक राहतील.